# डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही काळाची गरज

## ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षेचे धडे



लातूर,दि.२२ : आजचे युग हे संपूर्णपणे डिजिटल युग म्हणून ओळखले जाते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांचाच इंटरनेट आणि स्मार्टफोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र, या वाढत्या वापरासोबतच सायबर गुन्हेगारीचे आणि फसवणुकीचे प्रमाणही तितक्याच वेगाने वाढत आहे. हीच काळाची गरज ओळखून 'क्विक हील फाउंडेशन'च्या अधिकृत उपक्रमांतर्गत येथील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रामध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांसाठी सायबर शिक्षण - सायबर सुरक्षा या विषयावर एका प्रभावी जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचा ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लाभ घेतला.

या विशेष सत्राचे नेटके नियोजन राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थी जाधव साहिल आणि परमेश्वर पांढरे यांनी केले. शालेय विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन सायबर सुरक्षेसारखा तांत्रिक विषय त्यांनी अत्यंत सोप्या आणि प्रात्यक्षिक उदाहरणांसह समजेल अशा भाषेत मांडला. आजकालच्या मुलांमध्ये ऑनलाइन गेम्सचे प्रचंड आकर्षण आहे. हेच ओळखून मार्गदर्शकांनी प्रामुख्याने ऑनलाइन गेमिंग स्कॅम, बँक खात्यांशी संबंधित असणारी ओटीपी (OTP) फसवणूक, बनावट लिंक्स, फिशिंग, सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारी फसवणूक, डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी, मजबूत पासवर्डचे महत्त्व आणि सुरक्षित इंटरनेट वापराचे नियम याबाबत सविस्तर माहिती दिली.

हे सत्र अत्यंत संवादात्मक झाले, कारण उपस्थित विद्यार्थ्यांनी यात अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला होता. मुख्य मार्गदर्शनानंतर आयोजित करण्यात आलेल्या विशेष शंका-निरसन सत्रात विद्यार्थ्यांनी प्रश्नांची सरबत्ती केली. ऑनलाइन फसवणूक कशी ओळखावी?, संशयास्पद लिंकवर चुकून क्लिक झाले तर काय करावे?, जढझ कोणालाही का सांगू नये? आणि सुरक्षित पासवर्ड कसा तयार करावा? अशा अनेक प्रश्नांची मार्गदर्शकांनी शास्त्रोक्त व समाधानकारक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांचा हा सकारात्मक प्रतिसाद आणि शिकण्याची उत्सुकता पाहून संपूर्ण उपक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.

विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित डिजिटल सवयी विकसि[त] करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली ह[ा] उपक्रमा राबविण्यात आला. य[ा] कार्यक्रमाच्या यशस्व[ी] आयोजनासाठी ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राचे मानन[ीय] मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृं[द] आणि कर्मचारी यांनी मोला[चे] सहकार्य केले. त्यांच्या उत्कृ[ष्ट] नियोजनामुळे हे सत्र यशस्वीरीत्[या] पार पडले. भविष्यातही अशा[च] प्रकारचे सायबर जागरूकत[ा] उपक्रम विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राबविण्याच[ा] संकल्प यावेळी व्यक्त करण्या[त] आला. या समाजोपयोग[ी] उपक्रमाबद्दल क्विक हील फाउंडेश[न] आणि राजर्षी शाह[ू] महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यां[चे] सर्वत्र कौतुक होत आहे.

...ागार अधीक्षक

ग्रामपंचायत कार्यालय महाराणाप्रताप नगर, ता. जि. लातूर